

बारामती : टीसी महाविद्यालयात आयोजित कुंभारी हस्तकला कार्यशाळेस उपस्थित मान्यवर.

# टीसी महाविद्यालयात कुंभारी हस्तकला प्रशिक्षण

**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागामध्ये पर्यावरण संवर्धन व परिसर सुशोभीकरण समिती अंतर्गत कुंभारी हस्तकला एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दीपक कुंभार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष कुंभारी चाकावर संक्रांतीचे खण, कुंडी, फ्लॉवर पॉट, विविध शोभेच्या वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले गेले. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या सृजनशीलता व कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच शिक्षणाबरोबरच व्यावसायिक दृष्टिकोन रुजविणे व पारंपरिक संस्कृती जतन करणे यासाठी आयोजित करण्यात आली. बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेऊन स्वतः शोभेच्या विविध वस्तू बनविल्या. या कार्यशाळेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या वैशाली माळी, समन्वयक राजेंद्र आगवणे व गोरखनाथ मोरे यांचे सहकार्य लाभले. पर्यावरण संवर्धन समिती प्रमुख उदय कळंत्रे यांनी स्वागत केले, स्मिता मंगुडकर यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी मार्गदर्शन केले.

Scanned with OKEN Scanner

# बारामतीमध्ये महिला सशक्तीकरणासंबंधी जनजागृती

## टी. सी.च्या विद्यार्थ्यांकडून विविध उपक्रम

**पुढारी ANCHOR**

बारामती : पुढारी वृत्तसेवा

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज विभागामार्फत निर्भया दिनानिमित्त महिला सशक्तीकरणासंबंधी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या वेळी निर्भया पथकाच्या हवालदार अमृता भोइटे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी निर्भया पथकाची माहिती देत महिलांनी सक्षम होणे गरजेचे आहे, असे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सीमा गोसावी होत्या. त्यांनी देखील महाविद्यालयातील मुलींना आपल्या सुरक्षिततेबाबत जागरूक राहण्याबाबत मार्गदर्शन केले.



महिला सशक्तीकरणासंबंधी पथनाट्य सादर करताना मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज विभागाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 'अनलॉक द अनटोल्ड स्टोरीज' व 'ओपन माइक' या उपक्रमांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणिवेतून 'बलात्कार' या विषयावर पथनाट्य सादर केले. तसेच स्त्रीभ्रूणहत्या, घरगुती अत्याचार, सायबर क्राइम, हुंडाबळी, ॲसिडहल्ले व वैवाहिक बलात्कार, या विषयांवर आधारित लघुनाटिका सादर केल्या. नाटिकांदरम्यान महिलांच्या सुरक्षिततेसाठी असणारे कायदे व नियम यांची माहिती देण्यावर विद्यार्थ्यांचा विशेष भर होता. या कायदे व नियमांविषयी सविस्तर माहिती मिळावी, यासाठी खास पोस्टर प्रदर्शन देखील भरविण्यात आले होते. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांनी कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी, हिंदी विभागातील प्रा. डॉ. प्रतिभा जावळे, मराठी विभागातील प्रा. डॉ. मुक्ता अंभोरे, मीडिया अँड कम्युनिकेशन विभागातील प्रा. रणजित पंडित, प्रा. गायत्री नंदकुमार, इतर महिला प्राध्यापक, महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक मीडिया अँड कम्युनिकेशन विभागप्रमुख प्रा. राहुल चौधरी यांनी केले. प्रा. ऋतुजा अगम यांनी आभार मानले.

### सीक्रेट बॉक्सचे विशेष आकर्षण

खास महिला सशक्तीकरणासाठी राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमात 'अनलॉक द अनटोल्ड स्टोरीज' या उपक्रमाचे विशेष आकर्षण होते. प्रत्येकाच्या आयुष्यात कधी ना कधी कुणालाच न सांगण्यासारखा एखादा प्रसंग, अडचण किंवा दुःख असतेच. त्यामुळे मानसिकरीत्या होणारा त्रास देखील भयंकर असतो. यासाठी विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी महाविद्यालयात ठिकठिकाणी सिक्रेट बॉक्स ठेवण्यात आले होते. विशेष म्हणजे, यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

Scanned with OKEN Scanner

पुढारी
बुधवार, २८ डिसेंबर २०२२
४

# टी. सी. महाविद्यालयाच्या 'भू-भू'ला श्रीराम करंडक

पुढारी ANCHOR

बारामती : पुढारी वृत्तसेवा

पुरुषोत्तम करंडक महाअंतिम स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संघाने दमदार कामगिरी केली. उत्कृष्ट अभिनेता व उत्तेजनार्थ अभिनेत्री यासमवेत महाअंतिम फेरीतील द्वितीय क्रमांकाच्या श्रीराम करंडकावर नाव कोरले आहे.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संघाने अभिनेता प्रशांत निगडे लिखित 'भू-भू' ही एकांकिका सादर केली होती. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या स्तरावर झालेल्या विजेत्या महाविद्यालयांच्या एकांकिकांमध्ये ही महाअंतिम लढत दि. २४ व २५ डिसेंबरदरम्यान झाली. महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेच्या वतीने पुरुषोत्तम करंडक स्पर्धा आयोजित केली जाते. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेला १४ ऑगस्टपासून सुरुवात झाली. अंतिम फेरीसाठी निवडलेल्या ९ संघांच्या एकांकिका १० व १८ सप्टेंबरदरम्यान सादर झाल्या होत्या. ही स्पर्धा भरत नाट्य मंदिर, सदाशिव पेठ, पुणे या ठिकाणी घेण्यात आली होती. 'मारकू'ची भूमिका करणाऱ्या सनी पवारला सर्वोत्कृष्ट अभिनय नैपुण्य अभिनेता व 'मखमली'चे पात्र साकारणाऱ्या मयूरी निकमला अभिनय उत्तेजनार्थ अभिनेत्री हा पुरस्कार देण्यात आला. अंतिम फेरीमध्ये 'भू-भू'ने हरी विनायक करंडक जिंकून महाअंतिम फेरीमध्ये प्रवेश मिळविला होता. प्राचार्य डॉ. मुरुमकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ. भीमराव तोरणे, राजेंद्र कंडरे, आदेश यादव, गणेश उपाध्याय यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी या सर्वांनी भू-भू टीमचे अभिनंदन केले आहे.



एकांकिकेत भूमिका साकारणारे विद्यार्थी व करंडकासह प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.

Scanned with OKEN Scanner

दैनिक महाराष्ट्र. टाईम्स दि.१६/१२/2022 प.न.नं.3

# 'पुरुषोत्तम'ची महाअंतिम फेरी २४ डिसेंबरपासून

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'महाराष्ट्रीय कलोपासक'च्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या 'पुरुषोत्तम करंडक' आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी २४ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. यंदा पाच विभागांतील १८ संघांमध्ये चुरस होणार आहे.

'पुरुषोत्तम करंडक २०२२'ची महाअंतिम फेरी भरत नाट्य मंदिर येथे २४ ते २६ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. सकाळी नऊ ते दुपारी एक आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ या दोन सत्रांमध्ये स्पर्धा होणार असून, प्रत्येक सत्रात चार संघांचे सादरीकरण होणार आहे.

पुणे आणि नागपूर विभागांतून अनुक्रमे तीन क्रमांकांचे संघ महाअंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत. रत्नागिरी, कोल्हापूर आणि जळगाव या विभागांतून प्रत्येकी चार संघ महाअंतिम फेरीत दाखल झाले आहेत. महाअंतिम फेरीनंतर २६ डिसेंबरला बक्षीस वितरण समारंभ होणार असल्याचे 'कलोपासक'चे मंगेश शिंदे यांनी सांगितले.

## पुणे विभागातील तीन संघ महाअंतिम फेरीत

स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत प्रथम तीन क्रमांक आणि सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ही पारितोषिके प्राप्त झालेले संघ महाअंतिम फेरीत दाखल होतात. मात्र, यंदा प्राथमिक फेरीत पुरुषोत्तम करंडक आणि सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकासाठीचा करंडक कोणत्याही संघाला दिला नव्हता. त्यामुळे पहिली तीन बक्षिसे पटकावलेले पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी), बारामतीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आणि मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयांचे संघ महाअंतिम फेरीत दाखल झाले आहेत.

मटा १६/१२/22 पान 3

# बारामती येथील महाविद्यालयाचा 'स्टेला मेरीस'सह शैक्षणिक करार

**बारामती, ता. २० :** उच्च शिक्षणातील गुणवत्तेच्या आधारे विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने तमिळनाडूतील चेन्नई येथील स्टेला मेरीस महाविद्यालयासोबत नुकताच शैक्षणिक करार केला.

या करारामुळे संयुक्त संशोधन उपक्रम आणि प्रकाशने, संयुक्त कार्यक्रम, परिसंवाद, परिषद आणि शैक्षणिक बैठकांचे आयोजन, शिक्षक व विद्यार्थ्यांना परस्पर महाविद्यालयांत काम करण्यासह शैक्षणिक माहिती आणि सामग्रीची देवाणघेवाण करण्यात येणार आहे.

या वेळी आधुनिक तंत्रज्ञानसंगत, तंत्रकौशल्यावर आधारित, ज्ञानरचनावाद व नवनिर्मिती मूल्यांवर आधारित उच्च शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणार आहे, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी सांगितले. या प्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, आयक्यूएसी को-ऑर्डिनेटर डॉ. योगिनी मुळे, स्टेला मेरीस महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जोसेफ रोसी, आयक्यूएसी को-ऑर्डिनेटर डॉ. लक्ष्मी प्रिया तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, रुसा को-ऑर्डिनेटर डॉ. रामचंद्र सपकाळ, परीक्षा मूल्यमापन को-ऑर्डिनेटर डॉ. वैशाली पाटील, डॉ. सचिन गाडेकर आदी उपस्थित होते.

दै सकाळ दि २१/१/२०२३ पान नं ५

Scanned with OKEN Scanner

दैनिक सकाळ दि: 22/09/2023 पान नं. ८

# मराठीतूनही उच्चतम भवितव्य घडविता येते

## डॉ. संगीता बर्वे यांचे बारामतीतील कार्यक्रमात प्रतिपादन



बारामती : कार्यक्रमात बोलताना डॉ. संगीता बर्वे.

**बारामती, ता. २१ :** विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये मराठी भाषेचे मोठे योगदान आहे. मराठीचा न्यूनगंड न बाळगता या माध्यमातून आपले उच्चतम भवितव्य घडविता येते, असे प्रतिपादन लेखिका व कवयित्री डॉ. संगीता बर्वे यांनी केले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित 'माझा काव्य प्रवास' या विषयावर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर अध्यक्षस्थानी होते.

डॉ. बर्वे म्हणाल्या, की आपण कायम विद्यार्थी राहत नाही. नवीन ज्ञान संपादन करण्याची तयारी ठेवायला हवी. मराठी भाषेतही आपण आपले भवितव्य उत्तमरितीने घडवू शकतो. आपल्या व्यक्तिमत्त्व विकासात बारामतीचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. संगीता बर्वे या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी असल्याने त्यांनी त्या काळातील आठवणी जागवल्या.

बालसाहित्यातील कवितानिर्मितीचा प्रवास उलगडत सांस्कृतिक, नाट्य व चित्रपटांतील अनुभव त्यांनी सांगितले. धर्मवीर चित्रपटातील गुरुपौर्णिमेच्या त्यांच्या गीतनिर्मितीची माहिती त्यांनी या वेळी दिली. डॉ. मुरूमकर म्हणाले, की मराठी भाषा, संस्कृती संवर्धनाची जबाबदारी अभ्यासकांवर आहे. कलावंताची खरी ओळख आत्मप्रकटीकरणातूनच होत असते.

डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी प्रास्ताविक परिचय करून दिला. डॉ. मुक्ता आंभेरे यांच्या 'शोध अस्तित्वाचा' या काव्यसंग्रहाचे या प्रसंगी प्रकाशन करण्यात आले. डॉ. राजकुमार तरडे यांनी सूत्रसंचालन केले.

22/9/2023 पान ८
सकाळ

Chaturche

Scanned with OKEN Scanner

दै. पुढारी दि. 23/09/2023 पान. नं. 8

# तुळजाराम महाविद्यालयामध्ये अनेकान्त आविष्कार उत्साहात

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय कनिष्ठ विभागांतर्गत अनेकान्त आविष्कार नुकताच पार पडला. या वेळी विद्यार्थी व शिक्षक गुणगौरव समारंभ उत्साहात साजरा झाला.

या समारंभासाठी अभिनव फार्मर क्लब पुणेचे ज्ञानेश्वर बोडके यांची मुख्य उपस्थिती होती. अध्यक्षस्थान डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी भूषविले.

ज्ञानेश्वर बोडके यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये सेंद्रिय शेती करून विषमुक्त पिके कशी पिकवली जातात, तसेच कमीत कमी क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त उत्पन्न कसे घेतले जाते आणि सेंद्रिय फळे, भाज्या, पिके खाल्ल्याने आपण आजारमुक्त कसे होऊ शकतो हे विविध उदाहरणाच्या माध्यमातून स्पष्ट केले.

अनेकान्त आविष्कारअंतर्गत घेतलेल्या स्पर्धामध्ये वर्किंग मॉडेल, स्मार्ट सिटी, मॉडेल काव्यवाचन, प्रश्नमंजुषा, फनी गेम्स, बेस्ट टॅग लाईन, बेस्ट रील, रांगोळी, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे पारितोषिक वितरण करण्यात आले. अनेकान्त सामान्यज्ञान स्पर्धेचे पारितोषिक वितरण केले. या समारंभासाठी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अमोल बनकर, प्रा. सोनल ब्राम्हणकर यांनी केले. आभार वैशाली पोळ यांनी मानले. या समारंभाचे नियोजन प्रा. अनिता पाटील यांनी केले.



यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

पुढारी 23/9/2023 पान 8

# टी. सी. महाविद्यालयाचा 'स्टेला मेरिस'शी करार

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने तमिळनाडूतील चेन्नईच्या स्टेला मेरिस कॉलेजशी नुकताच शैक्षणिक करार केला.

उच्च शिक्षणातील गुणवत्तेच्या आधारे दोन्ही संस्थांमधील विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा करार केला गेला. बारामतीच्या या महाविद्यालयाची १९४७ मध्ये स्थापना झाली असून, धार्मिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त आहे.



बारामतीचे टी. सी. व चेन्नईचे स्टेला मेरिस कॉलेज यांच्यात शैक्षणिक सांमजस्य करार पार पडला.

या करारामुळे संयुक्त संशोधन उपक्रम आणि प्रकाशने, संयुक्त कार्यक्रम, परिसंवाद, परिषद आणि शैक्षणिक बैठकांचे आयोजन, शिक्षक आणि विद्यार्थ्यांची देवाणघेवाण होणार आहे. त्याचबरोबर शैक्षणिक माहिती आणि सामग्रीची देवाणघेवाण होणार असून, विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान संगत, तंत्रकौशल्यावर आधारित, ज्ञानरचनावाद व नवनिर्मिती मूल्यावर आधारित उच्च शिक्षण मिळणार आहे, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी सांगितले.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या आयक्यूएसी कोऑर्डिनेटर डॉ. योगिनी मुळे, स्टेला मेरिस कॉलेजच्या प्राचार्या डॉ. जोसेफ रोसी, आयक्यूएसी कोऑर्डिनेटर डॉ. लक्ष्मी प्रिया तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, रुसा कोऑर्डिनेटर डॉ. रामचंद्र सपकाळ, परीक्षा मूल्यमापन कोऑर्डिनेटर डॉ. वैशाली पाटील, डॉ. सचिन गाडेकर उपस्थित होते.

Tuljaram Chaturchand College
Library
★ Baramati ★

Scanned with OKEN Scanner

दै. सकाळ दि. ५/०२/२०२३ पान नं. ३

# टीसी महाविद्यालयात संस्कृत प्रमाणपत्र वर्ग

बारामती, ता. ४ : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने संस्कृत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला आहे. संस्कृत शिकण्याची इच्छा असणाऱ्यांना याचा फायदा होणार आहे. प्राचीन भारतीय संस्कृती, भारतीय भाषा अशा विषयांमध्ये रुची असणाऱ्यांसाठी ज्ञानाचे दालन खुले झाले आहे.

संस्कृत भाषेचा इतिहास, वर्णमाला, उच्चारण पद्धतीतील तर्कशुद्धता, वेदवाङ्मयाविषयी प्राथमिक माहिती, श्रृति, स्मृती, पुराणग्रंथ यांचे वर्ण्यविषय, भगवद्-गीता परिचय, संस्कृत काव्य शैलीचा परिचय, संस्कृत नाटक : उगम व विस्तार, व्यवहारोपयोगी संस्कृत सुभाषिते, अशा विविध अंगांचा परिचय करून दिला जाईल. परिपूर्ण शिक्षण होण्याच्या दृष्टीने व्याख्यानांबरोबरच प्रात्यक्षिकांचाही समावेश या अभ्यासक्रमात केला आहे. या वर्गास प्रवेश घेण्यासाठी वयाची कोणतीही अट नाही. सुसज्ज ग्रंथालय, तज्ज्ञ प्राध्यापक, सर्वांना समजेल अशा मराठी माध्यमातून अध्यापन आणि मान्यवर तज्ज्ञांच्या कौतुकास पात्र ठरलेला अभिनव अभ्यासक्रम ही या वर्गाची वैशिष्ट्ये आहेत.

सकाळ ५।२।२०२३, ३

Scanned with OKEN Scanner

दै. सकाळ दि. ३१/०१/२०२३ पान नं. ८

# टीसी महाविद्यालयाला आयएसओ मानांकन

बारामती, ता. ३० : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास आयएनएबी आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन गुणवत्ता संस्था (सिंगापूर) तर्फे व जिओ टेक ग्लोबल सर्टिफिकेशन यांच्यावतीने आयएसओ २१००१: २०१८ हे मानांकन प्राप्त झाले आहे. महाविद्यालयासाठी पर्यावरण स्वायत्त सर्टिफिकेशन व त्याबरोबरीने ग्रीन ऑडिट, जेंडर सेन्सिटायझेशन आणि एनर्जी मॅनेजमेंट ही सर्टिफिकेशन प्रदान केली.

या महाविद्यालयाने गेल्या वर्षामध्ये त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी उपक्रमांच्या मार्फत कसोशीने प्रयत्न केले होते. औद्योगिक क्षेत्राशी निगडित समाजाभिमुख अभ्यासक्रम, सातत्याने विद्यार्थ्यांचे गुणांकन, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी केले जाणारे विविध उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांच्या कौशल्याला वाव मिळावा यासाठी अनेक अभ्यासक्रम, शैक्षणिक व्यवस्थापन या सर्व घटकांची तपासणी करून हे मानांकन दिले आहे. या मानांकनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर व सर्व विश्वस्तांनी अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी संस्थेने दिलेल्या सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळेच ही मानांकने प्राप्त करणे शक्य झाले असे नमूद केले आहे.

सकाळ
दि. ३१/१/२०२३ पान ८

दैनिक पुढारी दि. ३१/०१/२०२३ पान नं. ४

# टी. सी. महाविद्यालयाला आयएसओ

बारामती पुढारी वृत्तसेवा

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास सिंगापूरच्या आयएनएबी आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन गुणवत्ता संस्थेकडून आयएसओ २१००१- २०१८ हे मानांकन प्राप्त झाले आहे.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास आयएनएबी आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन गुणवत्ता संस्था सिंगापूर यांचेतर्फे व जिओ टेक ग्लोबल सर्टीफिकेशन प्रा. लि. ठाणे यांच्यामार्फत शैक्षणिक क्षेत्रातील उच्च दर्जाच्या व्यवस्थापनासाठी आयएसओ २१००१- २०१८ हे मानांकन नुकतेच प्राप्त झाले. यासाठी महाविद्यालयाने गेल्या वर्षभरापासून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी उपक्रमांच्या मार्फत कसोशीने प्रयत्न केले होते, त्यामुळे हे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याने महाविद्यालयाचे कौतुक होत आहे.

महाविद्यालयाने अल्पसंख्याक दर्जाबरोबरच स्वायत्त दर्जा प्राप्त करून शैक्षणिक क्षेत्रातील एक नवा मापदंड तयार केला आहे. औद्योगिक क्षेत्राशी निगडीत अनेक समाजाभिमुख अभ्यासक्रम, सातत्याने विद्यार्थ्यांचे गुणांकन, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी सातत्यपूर्ण पद्धतीने आयोजन केले जाणारे विविध उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी निर्माण केल्या गेलेल्या विविध शैक्षणिक सोयी-सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या कौशल्याला वाव मिळावा यासाठी योजलेले अनेक अभ्यासक्रम आणि या सर्वांचे उत्तम शैक्षणिक व्यवस्थापन या सर्व घटकांची अत्यंत काटेकोरपणे तपासणी करून वरील समितीने हे सर्टीफिकेशन बहाल केले.

याबरोबरच सदर समितीने महाविद्यालयासाठी पर्यावरण स्वायत्त सर्टीफिकेशन व त्याबरोबरीने ग्रीन ऑडिट, जेंडर सेन्सिटायझेशन आणि एनर्जी मॅनेजमेंट ही सर्टीफिकेशन प्रदान केली. महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जाचा आलेख उंचावला जात असताना प्राप्त झालेल्या या मानांकनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, सर्व विश्वस्त यांनी सर्वांचे विशेष अभिनंदन केले आहे.

या वेळी संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी संस्थेने दिलेल्या सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळेच ही मानांकने प्राप्त करणे शक्य झाले असे नमूद केले.महाविद्यालयाच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले व त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पुढारी दि. ३१/१/२०२३ पान नं. ४

Tuljaram Chaturchand College Library Baramati

Scanned with OKEN Scanner

दै. सकाळ दि. ०५/०२/२०२३ पान नं-३

# टीसी महाविद्यालयात संस्कृत प्रमाणपत्र वर्ग

**बारामती, ता. ४ :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने संस्कृत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला आहे. संस्कृत शिकण्याची इच्छा असणाऱ्यांना याचा फायदा होणार आहे. प्राचीन भारतीय संस्कृती, भारतीय भाषा अशा विषयांमध्ये रुची असणाऱ्यांसाठी ज्ञानाचे दालन खुले झाले आहे.

संस्कृत भाषेचा इतिहास, वर्णमाला, उच्चारण पद्धतीतील तर्कशुद्धता, वेदवाङ्मयाविषयी प्राथमिक माहिती, श्रुति, स्मृती, पुराणग्रंथ यांचे वर्ण्यविषय, भगवद्-गीता परिचय, संस्कृत काव्य शैलीचा परिचय, संस्कृत नाटक : उगम व विस्तार, व्यवहारोपयोगी संस्कृत सुभाषिते, अशा विविध अंगांचा परिचय करून दिला जाईल. परिपूर्ण शिक्षण होण्याच्या दृष्टीने व्याख्यानांबरोबरच प्रात्यक्षिकांचाही समावेश या अभ्यासक्रमात केला आहे. या वर्गास प्रवेश घेण्यासाठी वयाची कोणतीही अट नाही. सुसज्ज ग्रंथालय, तज्ज्ञ प्राध्यापक, सर्वांना समजेल अशा मराठी माध्यमातून अध्यापन आणि मान्यवर तज्ज्ञांच्या कौतुकास पात्र ठरलेला अभिनव अभ्यासक्रम ही या वर्गाची वैशिष्ट्ये आहेत.

सकाळ ५/२/२३, ३

Tuljaram Chaturchand College Library Baramati

Scanned with OKEN Scanner

वृत्तपत्रकात्रण फाईल

दै. सकाळ दि. ४/०२/२०२३ पान नं. ४

# बारामतीतील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र

बारामती, ता. ३ : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'हिंदुस्थानची फाळणी व त्याचे परिणाम' यावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर होते.

या प्रसंगी डॉ. अशोक चौसाळकर (संपादक समाजप्रबोधन पत्रिका कोल्हापूर) ज्येष्ठ पत्रकार जतिन देसाई, डॉ. गोरख थोरात व डॉ.आनंद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दहशतवादावर आधारित देश प्रगती करू शकत नाहीत. शांतता, परस्परांवरील विश्वास व एकमेकांशी संवादपूर्ण संबंध राहिले तरच भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांना त्याचा फायदा होऊ शकतो असे डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले. डॉ. आनंद कुलकर्णी यांनी इंग्रजी साहित्यातील दाखले देऊन फाळणीची दाहकता श्रोत्यांसमोर मांडली.

प्रास्ताविक डॉ. शशांक माने यांनी केले. हिंदी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र व समाजशास्त्र या विभागातर्फे या चर्चासत्राचे आयोजन केले गेले. डॉ. प्रदीप सरवदे, डॉ. हनुमंत फाटक, डॉ. संदीप तारदाळकर व विनायक लष्कर यांनी नियोजन केले. स्मिता गोरे, ऐश्वर्या वाघमारे व संदेश राठोड यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ ४/२/२०२३ पान नं ४

दै. सकाळ दि. ५/०२/२०२३ पान नं ३

# टीसी महाविद्यालयात संस्कृत प्रमाणपत्र वर्ग

बारामती, ता. ४ : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने संस्कृत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला आहे. संस्कृत शिकण्याची इच्छा असणाऱ्यांना याचा फायदा होणार आहे. प्राचीन भारतीय संस्कृती, भारतीय भाषा अशा विषयांमध्ये रुची असणाऱ्यांसाठी ज्ञानाचे दालन खुले झाले आहे.

संस्कृत भाषेचा इतिहास, वर्णमाला, उच्चारण पद्धतीतील तर्कशुद्धता, वेदवाङ्मयाविषयी प्राथमिक माहिती, श्रुति, स्मृती, पुराणग्रंथ यांचे वर्ण्यविषय, भगवद्-गीता परिचय, संस्कृत काव्य शैलींचा परिचय, संस्कृत नाटक : उगम व विस्तार, व्यवहारोपयोगी संस्कृत सुभाषिते, अशा विविध अंगांचा परिचय करून दिला जाईल. परिपूर्ण शिक्षण होण्याच्या दृष्टीने व्याख्यानांबरोबरच प्रात्यक्षिकांचाही समावेश या अभ्यासक्रमात केला आहे. या वर्गास प्रवेश घेण्यासाठी वयाची कोणतीही अट नाही. सुसज्ज ग्रंथालय, तज्ज्ञ प्राध्यापक, सर्वांना समजेल अशा मराठी माध्यमातून अध्यापन आणि मान्यवर तज्ज्ञांच्या कौतुकास पात्र ठरलेला अभिनव अभ्यासक्रम ही या वर्गाची वैशिष्ट्ये आहेत.

सकाळ दि ५/२/२०२३ पान ३

दै. सकाळ दि. ४/०२/२०२३ पान नं. ४

# बेसबॉल स्पर्धेत पुणे विभाग प्रथम

बारामती, ता. ३ : येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्यावतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेत मुले व मुलींच्या गटामध्ये पुणे विभागाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी तालुका क्रीडा अधिकारी अनिल सातव, राज्य क्रीडा मार्गदर्शक शिवाजी कोळी, महेश चावले, उपप्राचार्या वैशाली माळी आदी उपस्थित होते. या स्पर्धेत १९ वर्ष वयोगटातील मुंबई, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर व पुणे असे आठ विभागातील मुला-मुलींचे संघ सहभागी झाले होते.

सकाळ दि. ४/२/२०२३ पान ४

दै. सकाळ दि. ४/०२/२०२३ पान नं ५

# बारामती येथे ११ पासून राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

बारामती : येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज बारामती व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यावतीने ११ व १२ फेब्रुवारी रोजी, १२ व्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.

'नॅशनल एज्युकेशन पॉलिसी-२०२०' या विषयावर ही परिषद होणार असून, डॉ. अण्णासाहेब एम. गुरव, (कॉमर्स अँड मॅनेजमेंट शाखाप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांचे मार्गदर्शन होणार असून त्यांच्याच हस्ते उद्घाटन होणार आहे.

सकाळ दि. ४/२/२०२३ पान ५

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

Scanned with OKEN Scanner

दै. पुण्य नगरी ९/२/२३ पान ४

# मोबाइलच्या अतिवापरापासून तरुणांनी दूर राहावे

## ❑ चर्चासत्रात तज्ज्ञांचा सूर : बारामतीतील टी. सी. महाविद्यालयात 'युवा संवाद' कार्यक्रम

**बारामती : प्रतिनिधी**



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'साद युवा जगताला - वेध भविष्याचा' हा व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. या वेळी 'मोबाइलचा वाढता वापर व त्यातून निर्माण होणारे व्यसन', 'गुन्हेगारी समस्या, मुलांना गुन्हेजगताचं वाटणारं वाढतं आकर्षण व पर्यायाने पालकांच्या वाढत्या चिंता' यांसारख्या अनेक सामाजिक गोष्टींचा ऊहापोह यानिमित्ताने केला गेला. कार्यक्रमाला बारामती शहर पोलीस निरीक्षक सुनील महाडिक, मुख्याधिकारी महेश रोकडे, अॅड. फिरोज मुलाणी वक्ते म्हणून लाभले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सीमा गोसावी होत्या.

या वेळी सुनील महाडिक यांनी 'तरुणाई आणि गुन्हेजगत' या विषयावर त्यांच्या दैनंदिन कामातील अनुभवाच्या आधारे सखोलपणे या विषयाची उकल केली व तरुणाईने चुकीच्या गोष्टींपासून स्वतःला दूर ठेवण्याचे आवाहन केले.

मुख्याधिकारी रोकडे यांनी बारामती नगर परिषदेत केलेल्या स्वच्छता व इतर अनेक उल्लेखनीय कामांची बारामतीकरांना ओळख असून त्या अनुषंगाने त्यांनी 'शहरविकास व तरुणाईचे योगदान' या विषयावर जबाबदार नागरिक म्हणून तरुणाईच्या सक्रिय गोष्टींना बारकाईने मांडत त्याचे महत्त्व अधोरेखित केले.

अॅड. फिरोज मुलाणी यांनी 'व्यसन व तरुणाई' विषयाच्या अनुषंगाने मोबाइलच्या अतिवापराच्या व्यसनामुळे तरुणांची ऊर्जा वायफळ गोष्टीमुळे वाया जाते, याबद्दल खंत व्यक्त करत भारतीय संविधानातील आपले कर्तव्य पार पाडण्याचे व संत-महात्म्यांनी तरुणांकडून एक सक्षम भारत देश घडविण्यासाठी केलेल्या अपेक्षांच्या कसोटीवर खरे उतरण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचालन विवेक बळे यांनी केले. तर राष्ट्रवादीचे सचिव ओवेज बागवान यांनी आभार मानले. कार्यक्रमाला शहराध्यक्ष जयदादा पाटील, माजी नगरसेवक अमजद बागवान, प्रा. विलास पाटील, शहर युवक अध्यक्ष अविनाश बांदल, तुषार लोखंडे, अभिनंदन शहा उपस्थित होते.

पुण्य नगरी ९/२/२३ पान ४

Scanned with OKEN Scanner

## अवतीभवती



**बारामती : महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सुरू केलेले बेमुदत आंदोलन.**

# महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचे बारामतीत बेमुदत आंदोलन

**बारामती :** आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सोमवारपासून (ता. २०) बेमुदत संपास प्रारंभ केला आहे. दरम्यान, बारामतीतील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे सर्वच शिक्षकेतर कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. सेवांतर्गत सुधारित आश्वासित प्रगती योजनेचे रद्द केलेले शासन निर्णय पुनर्जीवित करून पूर्ववत करणे, सातव्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार दहा, वीस, तीस वर्षानंतरच्या लाभाची योजना लागू करणे, सातव्या वेतन आयोगाचा आजपर्यंतचा फरक अदा करणे, सन २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे अशा विविध मागण्यांसाठी महासंघाच्या व शिक्षकेतर संघटनेच्या आदेशानुसार महाविद्यालयातील कर्मचारी बेमुदत संपात सहभागी झाले आहेत. महाविद्यालयाच्या आवारातच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

Scanned with OKEN Scanner

दै. पुण्यनगरी दि. 28/02/2023 पान नं. 3

पुण्य नगरी

२८/२/२३ पान ३

## In Short

# टीसी महाविद्यालयाला दीड लाखाचे संशोधन साहित्य भेट

**बारामती :** बारामतीतील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील एम. एस्सी. भाग २ या वर्गाची शैक्षणिक सहल गोवामध्ये आयोजित केली होती. यामध्ये ४९ विद्यार्थी सहभागी झाले होते. शैक्षणिक सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी अॅक्वाग लॅबोरेटरी या संशोधन केंद्राला भेट दिली. या वेळी कंपनीचे संस्थापक चेअरमन डॉ. आनंद मळगे यांनी 'भविष्यकाळातील नोकरी व संशोधनाच्या संधी' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. तर, विद्यार्थ्यांची चौकसबुद्धी पाहता त्यांनी महाविद्यालयास एचपीएलसीचे दोन कॉलम संशोधन साहित्य भेट दिले. या शैक्षणिक सहलीस रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसमवेत प्रा. भीमराव तोरणे व डॉ. राहुल भांडव उपस्थित होते. ही उपकरणे व संदर्भ पुस्तके प्रा. डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांच्या हस्ते रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय काळे यांना सुपूर्त केले. या वेळी प्राचार्यांनी रसायनशास्त्र विभागाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Tuljaram Chaturchand College
Library
★ Baramati ★

Scanned with OKEN Scanner

दैनिक सकाळ दि. २८/०२/२०२३ पान. नं. ४



बारामती : संशोधन साहित्य स्वीकारताना डॉ. चंद्रशेखर मुरूमकर आणि इतर मान्यवर.

# बारामती येथील टी. सी. महाविद्यालयास दीड लाख रुपयांचे संशोधन साहित्य भेट

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील एम.एस्सी. भाग-२ या वर्गाच्या आयोजित सहलीत ४९ विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी अक्वांस लॅबोरेटरी या संशोधन केंद्राला भेट दिली. या कंपनीचे संस्थापक चेअरमन डॉ. आनंद मळगे यांनी 'भविष्य काळातील नोकरी आणि संशोधनाच्या संधी' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला व मार्गदर्शन केले. यादरम्यान विद्यार्थ्यांची चौकस बुद्धी पाहता त्यांनी महाविद्यालयास एच.पी.एल.सी. (दोन उपकरणे व संदर्भ पुस्तके) असे एकूण एक लाख ५७ हजारांचे संशोधन साहित्य भेट दिले. या शैक्षणिक सहलीस रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसमवेत भीमराव तोरणे व डॉ. राहुल भोंडवे उपस्थित होते. सदर उपकरणे व संदर्भ पुस्तके प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांच्या हस्ते रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय काळे यांना सुपूर्त करण्यात आले. रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांच्या कुशल बुद्धिमत्तेचा सन्मान झाला. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी रसायनशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सकाळ २८/२/२३, ४

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★

Scanned with OKEN Scanner

दै. पुढारी (पुणे जिल्हा) दि. 23/02/2023 पान नं. ५.

# टी. सी. महाविद्यालयास दीड लाखांचे संशोधन साहित्य भेट

बारामती : पुढारी वृत्तसेवा

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील एम.एस्सी. भाग-२ या वर्गाची शैक्षणिक सहल गोवा येथे आयोजित केली होती. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी अक्वास लॅबोरेटरी या संशोधन केंद्राला भेट दिली.

कंपनीचे संस्थापक चेअरमन डॉ.आनंद मळगे यांनी 'भविष्यकाळातील नोकरी आणि संशोधनाच्या संधी' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी महाविद्यालयास दीड लाखांचे संशोधन साहित्य भेट दिले. प्रा. भीमराव तोरणे व डॉ.राहुल भोंडवे उपस्थित होते. ही उपकरणे व संदर्भ पुस्तके प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांच्या हस्ते रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ.संजय काळे यांना सुपूर्त केले. विद्यार्थ्यांच्या कुशल बुद्धिमत्तेचा सन्मान झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर व सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांनी सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Tuljaram Chaturchand College ★ Library ★ Baramati

Scanned with OKEN Scanner

# देविदास भोसले यांना पीएच.डी



देविदास भोसले

बारामती : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागप्रमुख देविदास भोसले यांना पीएच.डी. पदवी मिळाली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी भोसले यांना 'मिलिटरी सायन्स' या विषयातून पीएच.डी पदवी प्रदान केली आहे. सोशल मीडिया- ए टूल टू स्प्रेड अँनिमोस्टी अँड इटस कॉन्सिक्विवेन्सेस ऑन नॅशनल सिक्युरिटी इन इंडिया हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. परभणीचे डॉ. चंद्रकांत भांगे यांनी त्यांना मार्गदर्शन केले. डॉ. भोसले तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात गेल्या १४ वर्षांपासून कार्यरत असून सध्या संरक्षणशास्त्र आणि सामरिक शास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून गेल्या ३ वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांनी दहा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भाग घेऊन शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. दोन पुस्तकांचे लेखन आणि १५ पुस्तकांचे संपादन त्यांनी केले आहे. त्यांना विविध पुरस्कारही प्राप्त झाले आहे.

Scanned with OKEN Scanner

दै. सकाळ दि. २६/०२/२०२३ पान नं. ८

# डॉ. माळी यांच्या संशोधनाला भारत सरकारचे पेटंट

## क्षारपड जमिनीतील मिठाचे प्रमाण कमी करण्यासाठीचे 'रेमेडिएशन ऑफ सलाईन सॉईल' मॉडेल



डॉ.भगवान माळी

**बारामती, ता. २५ :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. भगवान माळी यांनी क्षारपड (मीठफुट्या) जमिनीतील मिटाचे प्रमाण कमी करण्यासाठीचे 'रेमेडिएशन ऑफ सलाईन सॉईल' मॉडेल तयार केले होते. त्यांच्या या संशोधन मॉडेलला भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे.

आजच्या काळात रासायनिक खतांचा बेसुमार वापर वाढला असून शेतीला अशास्त्रीयरित्या पाणी देण्याची पद्धत व सेंद्रिय खतांचा अभाव, यामुळे हजारो हेक्टर जमिनीतील क्षाराचे प्रमाण वाढल्यामुळे उत्पादन क्षमता कमी झाली आहे. या नापिक जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी डॉ. माळी यांनी केलेल्या संशोधनाचा उपयोग होऊ शकतो.

याअगोदर डॉ. माळी यांनी गरिबांचा कुलर तयार केला. त्याचा वापर लाखो कुटुंब करीत आहेत. डॉ. माळी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये बऱ्हाणपूर निर्मलग्रामसाठी भरीव कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा 'उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी' पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. डॉ. माळी हे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात १८ वर्षांपासून प्राध्यापक म्हणून कार्यरत असून गेल्या दोन वर्षांपासून ते वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख आहेत. त्यांच्या या यशाबद्दल अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी अभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner

दैनिक पुढारी दि. २६/०२/२०२३ पान नं. ६ (पुणे जिल्हा)

# विद्यार्थ्यांना बहुआयामी कौशल्याची संधी

## डॉ. दत्तात्रय गायकवाड यांचे मत

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना बहुआयामी कौशल्य प्राप्त करण्याची संधी मिळणार आहे. त्यासाठी आताच्या पिढीने सजग राहायला हवे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र उस्मानाबादचे संचालक डॉ. दत्तात्रय गायकवाड यांनी केले.

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर अध्यक्षस्थानी होते. नियामक मंडळाचे सदस्य चंद्रगुप्त शाह वाघोलीकर, चंद्रवदन शहा मुंबईकर, सोनिक शहा पंदारकर, सत्यजित शहा पंदारकर, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, प्रा. सदाशिव पुराणिक, उपप्राचार्य, रजिष्ट्रार अभिनंदन शहा आदी उपस्थित होते.

जवाहर शाह म्हणाले, महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा सार्थ अभिमान वाटेल, अशी कामगिरी करावी.

या वेळी यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच विद्यापीठाच्या आविष्कार २०२३ संशोधन स्पर्धेतील कामगिरीबाबत प्रा. कृष्णा कुलकर्णी, शर्वरी मरकळे, विश्वजित नलावडे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी बी. एस्सी तृतीय वर्ष परीक्षेत प्रथम आलेल्या व आयआयटी प्रवेश परीक्षेत ऑल इंडिया रँक ११ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेला श्रेयस धुमाळ, बी. ए. परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थी ऋतिका शिंदे, जिद्दी दिव्यांग विद्यार्थी रितेश काळुखे, सुयश शेखर डोंबे आदी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी केले. वार्षिक अहवाल वाचन प्रा. सदाशिव पुराणिक यांनी केले.



टी. सी. महाविद्यालयात यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करताना संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर आदी.

पुढारी २६/२/२०२३ पान ६ (पुणे जिल्हा)

Scanned with OKEN Scanner

दैनिक सकाळ दि. २६/०२/२०२३ पान नं. ६.

# टीसी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

बारामती, ता. २५ : ''नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना बहुआयामी कौशल्य प्राप्त करण्याची संधी मिळणार आहे, आताच्या पिढीने सजग राहायला हवे, भविष्याच्या यशाची स्वप्ने रंगवताना वर्तमानाची जाणीव ठेवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे संचालक डॉ. दत्तात्रेय गायकवाड यांनी केले.



बारामती : गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना जवाहर वाघोलीकर आणि इतर मान्यवर.

बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वार्षिक गुणवत्ता पारितोषिक समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, चंद्रगुप्त शाह वाघोलीकर, चंद्रवदन मुंबईकर, सोनिक पंदारकर, सत्यजित पंदारकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी केले. तर, वार्षिक अहवाल वाचन सदाशिव पुराणिक यांनी केले.

''जवाहर वाघोलीकर म्हणाले, ''महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा सार्थ अभिमान वाटेल, अशी कामगिरी करावी. महाविद्यालयाच्या स्थापनेला ६१ वर्षे पूर्ण झाली असून या हीरक महोत्सवी यशाचे खरे मानकरी हे महाविद्यालयातून यश संपादन केलेले अनेक विद्यार्थी व त्यांना घडवणारे प्राध्यापक आहेत.'' याप्रसंगी कृष्णा कुलकर्णी, शर्वरी मरकळे, विश्वजित नलावडे, श्रेयस धुमाळ, ऋतिका शिंदे, रितेश काळुखे, सुयश शेखर यांचा जवाहर वाघोलीकर व दत्तात्रेय गायकवाड यांच्या हस्ते सत्कार झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय शेंडगे व विवेक बळे यांनी केले. राजेंद्र आगवणे यांनी आभार मानले.

Scanned with OKEN Scanner

दैनिक पुढारी दि. २६/०२/२०२३ पान नं. ६.

# विद्यार्थिनींनी डोळसपणे मैत्री करावी

- **पोलिस निरीक्षक सुनील महाडीक यांचे आवाहन**



निर्भय कन्या अभियानप्रसंगी पोलिस निरीक्षक सुनील महाडीक यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

युवा पिढी आभासी जगात गुंतत चालली आहे. विद्यार्थिनींनी डोळसपणे मैत्री केली पाहिजे; जेणेकरून फसवणूक होणार नाही. तरुणाईने सारासार विचारशक्ती आत्मसात करणे आवश्यक असल्याचे मत शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सुनील महाडीक यांनी व्यक्त केले.

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने निर्भय कन्या अभियानांतर्गत 'मुलींची सुरक्षितता' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते.

महाडीक म्हणाले की, प्रत्येक मुलीला-महिलेला सुरक्षित वाटलेच पाहिजे. स्त्रीला तिच्या स्त्रित्वावर हल्ला होईल, याची सर्वाधिक भीती असते. मुली जोपर्यंत न्याय आणि समता यांचे अर्थ व महत्त्व समजून घेत नाहीत तोपर्यंत त्यांचा आत्मविश्वास वाढणार नाही.

प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वतःचे ध्येय निश्चित केले पाहिजे. स्वतःला स्वतंत्र वेळ दिला पाहिजे. त्याप्रमाणे अंमलबजावणी केली तर निश्चितच यश दूर नाही. हे महाविद्यालय गेल्या अनेक वर्षांपासून निर्भय कन्या अभियान राबवीत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडण्यासाठी विद्यार्थ्यांनी जाणतेपणाने प्रयत्न केले पाहिजेत. जीवन सुंदर करण्याचे अनेक परिपाठ अशा कार्यशाळांतून विद्यार्थ्यांना मिळतात, त्याचा लाभ घेतला पाहिजे.

या कार्यशाळेसाठी बाया कर्वे स्त्री अभ्यास केंद्राच्या समृद्धी पानसे यांनी 'लिंगभाव संवेदीकरण' या विषयावर विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तरे स्वरूपात चर्चा केली. प्रा. राहुल शहा यांनी 'सायबर सुरक्षा : काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. प्रतिभा जावळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मेघा बडवे यांनी केले. डॉ. सीमा गोसावी यांनी आभार मानले.

दैनिक - जनमानसाचे सामान्याचे दि. २१/०२/२०२३ पान नं. ७

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील डॉ.भगवान माळी यांच्या संशोधन मॉडेलला भारत सरकारचे पेटंट

बारामती, दि.२१, (प्रतिनिधी)- येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.भगवान माळी यांनी क्षारपड (पीठफुट्या) जमिनीतील मिठाचे प्रमाण कमी करण्यासाठीचे 'रेमेडिएशन ऑफ सलाईन सॉईल' मॉडेल तयार केले होते. त्यांच्या या शेतीउपयोगी संशोधन मॉडेलला भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे.

आजच्या काळात रासायनिक खतांचा बेसुमार वापर वाढला असून शेतीला अवाजवीपरित्या पाणी देण्याची पद्धत व सेंद्रिय खतांचा अभाव यामुळे हजारो हेक्टर जमिनीतील क्षाराचे प्रमाण वाढल्याने उत्पादन क्षमता कमी झाली आहे. या नापीक जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी डॉ.भगवान माळी यांनी केलेल्या संशोधनाचा उपयोग होऊ शकतो.



याअगोदर डॉ.माळी यांनी गरीबांचा कुलर तयार केला. त्याचा वापर लाखो कुटुंब करीत आहेत. डॉ.माळी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमधून बारामती तालुक्यातील ब-हाणपूर गाव निर्मलग्राम साठी भरीव कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा 'उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी' पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. त्याचप्रमाणे मणिभाई देसाई राष्ट्रीय पुरस्कार, नेहरू युवा केंद्राचा उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार, मदुराई केरळ येथील फाऊंडेशनकडून उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार मिळाला होता.

डॉ.भगवान माळी हे या महाविद्यालयात गेल्या १८ वर्षांपासून प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत व गेल्या २ वर्षांपासून ते वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

Tuljaram Chaturchand College ★ Baramati ★ Library

Scanned with OKEN Scanner

दै. पुढारी दि. 2/03/2023 पान नं. ५ (पुणे जिल्हा)


मुरलीधर सातव


डॉ. जोशी-गांधी


अभिनंदन शहा

# अशासकीय महाविद्यालयीन रजिस्ट्रार असोसिएशन अध्यक्षपदी सातव

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

राज्य अशासकीय महाविद्यालयीन रजिस्ट्रार असोसिएशन अध्यक्षपदी पुण्याच्या जेधे महाविद्यालयाचे रजिस्ट्रार मुरलीधर सातव यांची निवड झाली. सरचिटणीसपदी औरंगाबादच्या देवगिरी महाविद्यालयाच्या डॉ. दर्शना जोशी-गांधी, तर खजिनदारपदी बारामतीच्या टी. सी. महाविद्यालयाचे रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांची निवड झाली.

महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन रजिस्ट्रार असोसिएशनची सभा नुकतीच पुण्यातील गरवारे महाविद्यालयात पार पडली. त्यात नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. असोसिएशनच्या कार्याध्यक्षपदी डॉ. संतोष शहापूरकर यांची निवड झाली. प्रमुख सल्लागारपदी राजगुरुनगर महाविद्यालयाचे रजिस्ट्रार गजानन पाठक यांची निवड झाली. या वेळी राज्यातील विविध महाविद्यालयांतील रजिस्ट्रार उपस्थित होते. बैठकीत अनेक विषयावर चर्चा व विचारविनिमय झाला. त्याचप्रमाणे उच्चशिक्षणातील विविध बदल, नवीन शैक्षणिक धोरण, स्वायत्तता, त्याचे दैनंदिन कामकाजावर होणा-या बदलावर करावयाची उपाययोजना यावर चर्चा झाली. बैठकीचे नियोजन गरवारे महाविद्यालयाचे रजिस्ट्रार साबळे यांनी केले. संघटनेचे विभागीय उपाध्यक्ष मॉडर्न महाविद्यालयाचे गणेश साठे यांनी आभार मानले.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

Scanned with OKEN Scanner

दैनिक पुढारी दि. २७/०२/२०२३ पान नं. ६ (पुणे जिल्हा)

# गणितशास्त्रावर टी. सी.त व्याख्यान

बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संस्कृत आणि गणित विभागामार्फत नुकतेच मप्राचीन भारतीय गणितशास्त्रफ या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

अध्यक्षस्थानी गणित विभागप्रमुख प्रा. सदाशिव पुराणिक होते. या वेळी संशोधक तेजस कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. व्याख्यानातून भारतीय गणित परंपरेची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. तसेच पाश्चात्य गणित आणि भारतीय गणित यांच्या गणित सोडविण्याच्या पद्धतीतील फरक सोदाहरण स्पष्ट करण्यात आले. आंतरविद्याशाखीय संशोधनाच्या संधींची चर्चा करण्यात आली. पाश्चात्य पद्धतीचे अंधानुकरण करण्यापेक्षा भारतीय गणितज्ज्ञांची पद्धती जाणून घेऊन त्यांच्या वापराने गणित विषय रंजक आणि उपयुक्त होईल, असे मत कुलकर्णी यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक संस्कृत विभागप्रमुख अनिरुद्ध किल्लेदार यांनी केले. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, डॉ. रामचंद्र सपकाळ यांचे या कार्यक्रमासाठी सहकार्य मिळाले.

पुढारी २७/२/२०२३ पान ६ (पुणे जिल्हा)

13 Feb. 2023

Tuljaram Chaturchand College Library Baramati

Scanned with OKEN Scanner

दैनिक 'सकाळ' दि. १/०३/२०२३ पान नं. ५

# टीसी महाविद्यालयात नेत्रतपासणी शिबिर

**बारामती, ता. २८ :** येथील टीसी महाविद्यालयाचा समाजशास्त्र विभाग व जतन फाउंडेशन यांच्यावतीने नेत्ररोग तपासणी व चष्मे वाटप शिबीराचे आयोजन केले होते.

एच.व्ही. देसाई आय हॉस्पिटल, भोई समाज बांधव, कृषी उत्पन्न बाजार समिती भिगवण यांच्या सहकार्याने डॉ. ललितकुमार गोखले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ या शिबीराचे आयोजन केले होते. या प्रसंगी जतनचे कार्यकारी संचालक रवींद्र झेंडे, विनायक लष्कर, नितीन चव्हाण, डॉ. अजम कुरेशी, भरत मल्लाव, नितीन इरिचे आदी उपस्थित होते. या मोफत शिबिरात २०० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून मोफत चष्म्याचे वाटप केले. तसेच, ३० रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे तपासणी मधून रुग्ण आढळून आले. या उपक्रमाला सरपंच उज्ज्वला परदेशी, तक्रारवाडीचे माजी सरपंच गणेश वायदंडे यांनी भेट दिली.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

दै. पुण्यनगरी दि. 9/03/2023 पान क्र. 3

# तरुणाईने सारासार विचारशक्ती आत्मसात करावी

❑ पोलीस निरीक्षक सुनील महाडिक

❑ तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'निर्भय कन्या' कार्यशाळा



बारामती । पोलीस निरीक्षक सुनील महाडिक यांचा सन्मान करताना प्रा. चंद्रशेखर मुरूमकर व इतर मान्यवर.

**। बारामती : प्रतिनिधी**

आजची युवा पिढी आभासी जगामध्ये गुंतत चालली आहे. विद्यार्थिनींनी डोळसपणे मैत्री केली पाहिजे. जेणेकरून फसवणूक होणार नाही. विद्यार्थिनींनी सजग व सतर्क असले पाहिजे. स्त्रियांसाठी अनेक कायदे सरकारने तयार केले आहेत. प्रसंगी न डगमगता त्याचा वापर केला पाहिजे, असे बारामतीतील पोलीस निरीक्षक सुनील महाडिक यांनी सांगितले.

विद्यार्थिनींनी निर्भय बनले पाहिजे. स्त्रियांमध्ये संपूर्ण समाजाला घडविण्याची शक्ती आहे. सांगत महाडिक यांनी अनेक थोर स्त्रियांची उदाहरणे दिली. तसेच, भूतकाळातील ऐतिहासिक उदाहरणे देऊन स्त्रियांच्या कार्याचा आढावा घेत ते म्हणाले, आता केंद्र सरकार, महाराष्ट्र शासनाचे अनेक कायदे स्त्रियांच्या बाजूने आहेत. वेगवेगळ्या योजना, कायदे, अडचणीच्या प्रसंगी मदतीचे फोन क्रमांक इ. माहिती दिली.

देशातील प्रत्येक मुलीला, महिलेला सुरक्षित वाटले पाहिजे, तो त्यांचा संवैधानिक अधिकार आहे. स्त्रीच्या स्त्रीत्वावर हल्ला होईल, याची सर्वाधिक भीती असते. मुली जोपर्यंत न्याय व समता यांचे अर्थ, महत्त्व समजूत घेत नाहीत, तोपर्यंत त्यांचा आत्मविश्वास वाढणार नाही. मुली अथवा महिलांवर होणारे अत्याचार, हिंसा यामध्ये आपल्या जवळची, विश्वासातली अथवा ओळखीची व्यक्ती असते.

ही कार्यशाळा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या, विद्यार्थी विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली होती. मुलींची सुरक्षितता हा कार्यशाळेचा विषय होता. अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. चंद्रशेखर मुरूमकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्वतःचे ध्येय निश्चित केले पाहिजे. स्वतःला वेळ दिला पाहिजे. त्याप्रमाणे अंमलबजावणी केली तर निश्चितच यश दूर नाही. हे महाविद्यालय मागील अनेक वर्षांपासून निर्भय कन्या अभियान राबवित आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडण्यासाठी विद्यार्थ्यांनी जाणतेपणाने प्रयत्न केले पाहिजे. जीवन सुंदर करण्याचे अनेक परिपाठ अशा कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना मिळतात, त्याचा लाभ घेतला पाहिजे, असे सांगितले, तर डॉ. सीमा नाईक यांनी आभार मानले. डॉ. मेघा बडवे यांनी सूत्रसंचालन केले. तर कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात सुमारे ३०० विद्यार्थिनींनी आपला सहभाग नोंदवला.

पुण्यनगरी दि 9/3/2023 पान 3

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दै. पुढारी दि. १/०३/२०२३ पान नं. ६



मराठी राजभाषादिनी उपस्थितांचा सत्कार करताना मुख्याधिकारी महेश रोकडे.

# मोरोपंत वाचनालयात मराठी राजभाषा दिन

बारामती : येथील बारामती नगरपरिषदेकडून कवी मोरोपंत वाचनालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी टी. सी. महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रा. मानाजी गावडे यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाची सुरुवात कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. तदनंतर राज्यगीताचे समूह गायन झाले. प्रमुख व्याख्याते प्रा. गावडे यांचा मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या हस्ते सन्मान झाला. कार्यक्रमाची सांगता हरित शपथ घेऊन करण्यात आली.

पुढारी १/३/२०२३ पान ६ पु०)

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

Scanned with OKEN Scanner

# महत्त्वाच्या कामावेळी मोबाईल बाजूला ठेवा

## खासदार सुप्रिया सुळे यांचा सल्ला; बारामती येथे साधला विद्यार्थ्यांशी संवाद

बारामती, ता. ३ : "तुम्हाला एखाद्या गोष्टीवर लक्ष एकाग्र करायचे असेल; तर त्या काळात कधीच मोबाईल हातात घेऊ नका, पूर्णपणे त्या कामावरच लक्ष केंद्रित करा. महत्त्वाच्या कामाच्या वेळेस मोबाईलच्या वापराने तुमचे लक्ष विचलित होते. त्यामुळे आपल्या ध्येयावरच लक्ष केंद्रित करायला हवे," असा कानमंत्र खासदार सुप्रिया सुळे यांनी आज दिला.

बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सुप्रिया सुळे यांनी अनेक विषयांवर आपली मते मांडली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी मनमोकळी उत्तरे दिली.



बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात सुप्रिया सुळे यांच्यासमवेत मान्यवर.

त्या म्हणाल्या, "आपले शिक्षण इतर मुलांप्रमाणेच झाले, महाविद्यालयीन जीवनापर्यंत मीही सर्वसाधारण मुलांप्रमाणेच होते, मात्र संसदेत मला चांगले गुण मिळतात आणि मला पारितोषिकही मिळते. माझे अर्धे आयुष्य मी माझ्या आईचा पदर धरून घालविले, पण आताचे अर्धे आयुष्य आता आई मला कुठेतरी थांब, असे सांगते. प्रत्येकाच्या आयुष्यात काही वळणे येत असतात व त्यावर त्यांच्यात काही बदल घडून येतात. मात्र, हे वळण नेमके कोणते, हे आपल्याला समजणे गरजेचे आहे. प्रत्येक दिवशी काय केले, याच्या नोंदी मी ठेवते. स्वतःला शिस्त लावून घ्यायची असेल; तर डायरी व नोंदींची गरज आहे. आत्मविश्वास हवा पण अतिआत्मविश्वास घातक ठरतो. शब्द हे खूप महत्त्वाचे असतात. त्यामुळे शब्दांचा वापर विचारपूर्वकच करा."

या प्रसंगी संस्थेचे सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, धवल वाघोलीकर, करण वाघोलीकर, चेतन शहा वाल्हेकर, संभाजी होळकर, सचिन सातव, जय पाटील आदी उपस्थित होते.

> "कोणत्याही विलावर मी तासभर बोलू शकते, कारण तो आत्मविश्वास माझ्यात आला आहे. तो तुमच्यातही येणे गरजेचे आहे. माझ्यासारखी एक लाजाळू मुलगी आज संसदेच्या पार्लमेंटरी बोर्डवर पारितोषिक देणाऱ्या समितीत जाऊ शकत असेल; तर प्रत्येक मुलाच्या आयुष्यात हे घडू शकते.
>
> **- सुप्रिया सुळे**, खासदार

पान 3 4/3/2023 सकाळ

Scanned with OKEN Scanner

दै. पुढारी दि ६/०३/२०२३ पान नं-५.

# टी. सी. महाविद्यालयात 'खासदार आपल्या भेटीला'

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'खासदार आपल्या भेटीला' या मुक्त संवादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात खा. सुप्रिया सुळे यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव मिलिंद शाह वाघोलीकर होते. या प्रसंगी करण शाह (वाघोलीकर), धवल शाह (वाघोलीकर), शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपप्राचार्या डॉ. सीमा नाईक-गोसावी, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. हनुमंत फाटक यांनी सुळे यांची प्रकट मुलाखत घेतली. या वेळी सुळे यांनी त्यांच्या राजकीय जडणघडणीबाबत माहिती दिली. पुरोगामी व सत्यशोधकी वारशाचे सासर-माहेर मिळालेच, पण जनतेची एक



टी. सी. महाविद्यालयात खासदार आपल्या भेटीला उपक्रम पार पडला.

प्रतिनिधी म्हणून माझ्या सजग प्रवासाने मला खूप काही शिकविले. भारतामध्ये जाती-धर्माची विविधता आहे. जातिभेद न मानता माणुसकी हाच खरा धर्म असून, परस्परांशी संवेदनशीलतेने वागणे हीच खरी ईश्वरसेवा आहे. श्रम हाच परमेश्वर आहे, असे त्या म्हणाल्या.

**खासदार सुप्रिया सुळेंचा विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद**

सात वेळा 'संसदरत्न पुरस्कार' मिळाल्याबद्दल त्या म्हणाल्या, जनतेच्या प्रश्नांची अभ्यासपूर्ण मांडणी केल्याची दखल घेऊन संसदेने हा पुरस्कार दिला. वाचनाने व्यक्तिमत्त्व घडते म्हणून विद्यार्थ्यांनीदेखील वाचनाचा व्यासंग जोपासावा.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी केले. सूत्रसंचालन सुषमा संगई यांनी केले. डॉ. हनुमंत फाटक यांनी आभार मानले.

Tuljaram Chaturchand College ★ Library ★ Baramati



टी. सी. महाविद्यालयात नेत्रतपासणी शिबिर पार पडले.

# टी. सी. महाविद्यालयात नेत्रतपासणी शिबिर

**बारामती :** बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा समाजशास्त्र विभाग आणि जतन फाउंडेशन पुणे, एच. व्ही. देसाई नेत्ररुग्णालय, भोई समाजबांधव व भिगवण बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ललितकुमार गोखले यांच्या स्मरणार्थ आयोजित नेत्ररोग तपासणी, चष्मे वाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर नुकतेच पार पडले. या वेळी जतन फाउंडेशनचे कार्यकारी संचालक रवींद्र झेंडे, समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. विनायक लष्कर, प्रा. नितीन चव्हाण, डॉ. अजम कुरेशी, दैनिक 'पुढारी'चे वार्ताहर भरत मल्लाव, माउली नगरे, नितीन इरिचे, कुंभारगावच्या सरपंच उज्ज्वला परदेशी, तक्रारवाडीचे माजी सरपंच गणेश वायदांडे आदी उपस्थित होते. शिबिरामध्ये भटक्या विमुक्त जाती-जमातीतील, इतर समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, वंचित समूहातील २०० लोकांची तपासणी करून मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच, ३० लोकांना मोतीबिंदूचे निदान झाल्याने त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली जाणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह-वाघोलीकर, संस्थेचे सचिव मिलिंद शाह-वाघोलीकर यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

Tuljaram Chaturchand College Library Baramati



Scanned with OKEN Scanner

दैनिक सकाळ दि. 3/03/2023 पान. नं ६.

# रजिस्ट्रार असोसिएशनच्या अध्यक्षपदी सातव



मुरलीधर सातव



दर्शना गांधी



अभिनंदन शहा

बारामती : महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन रजिस्ट्रार असोसिएशनच्या अध्यक्षपदी पुण्यातील जेधे महाविद्यालयाचे रजिस्ट्रार मुरलीधर सातव यांची, सरचिटणीसपदी औरंगाबादच्या दर्शना जोशी गांधी यांची; तर खजिनदारपदी बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांची निवड झाली. पुण्यातील गरवारे महाविद्यालयात असोसिएशनच्या बैठकीत या निवडीवर शिक्कामोर्तब झाले. गेल्यावर्षी ऑनलाइन सभेमध्ये निश्चित झाल्यानुसार नूतन कार्यकारिणीचे गठण झाले. राज्यातील विविध महाविद्यालयातील १२० रजिस्ट्रारपैकी ३० रजिस्ट्रार या बैठकीस उपस्थित होते. कार्याध्यक्ष म्हणून गडहिंग्लजच्या शिवाजी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार डॉ. संतोष शहापूरकर, राजगुरुनगर महाविद्यालयाचे रजिस्ट्रार गजानन पाठक यांची प्रमुख सल्लागारपदी निवड झाली. या असोसिएशनच्या बैठकीमध्ये उच्च शिक्षणात होणारे बदल, नवीन शैक्षणिक धोरण, स्वायत्तता त्याचे दैनंदिन कामकाजावर होणारे परिणाम, विविध बदलांवर करायची उपाययोजना, यावर प्रामुख्याने चर्चा झाली. या बैठकीचे नियोजन गरवारे महाविद्यालयाचे रजिस्ट्रार किसन साबळे यांनी केले. संघटनेचे विभागीय उपाध्यक्ष मॉडर्न महाविद्यालयाचे रजिस्ट्रार गणेश साठे यांनी आभार मानले.

सकाळ दि 3/03/2023 पान ६.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

https://mail.google.com/mail/u/1/#inbox/FMfcgzGrcrsNSZdKCisqfLsLsXnmFzTp?projector=1&messagePartId=0.2

Scanned with OKEN Scanner

दैनिक पुढारी दि. ९/३/२०२३ पान नं. २ (पुणे जिल्हा)

# टी. सी. महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

## रसायनशास्त्रातील सद्य:स्थिती, आव्हानांवर होणार विचारविनिमय

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे रुसा अंतर्गत दि. १० व ११ मार्च २०२३ रोजी ट्रेन्डस अ‍ॅण्ड चॅलेंजेस इन केमिस्ट्री ( ख्ल-२०२३) या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.

या परिषदेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. अविनाश कुंभार यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी स्टेला मेरिस महाविद्यालय, चेन्नईचे डॉ. विद्या कृष्णमूर्ती, बेंगलूरुच्या जैन विद्यापीठाचे डॉ. रमेश दातीर यांची उपस्थिती असेल. अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन होईल.

शनिवारी (दि. ११) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. दत्तप्रसाद पोरे व बेळगावच्या राणी चेन्नम्मा विद्यापीठाचे प्रा. डॉ. के. कांताराजन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर हे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

सामग्री संचलन, नवीन दिशादर्शकांमध्ये अन्वेषण करणे, प्रसार करणे, साहित्य, विज्ञान आणि अभियांत्रिकीतील सहयोगी संशोधनाला चालना देणे, शैक्षणिक व उद्योगांमधील संशोधकांसाठी एक मंच, विविध प्रकारच्या सामग्री आणि त्यांच्या अनुप्रयोगातील उत्कृष्ट संधी प्रदान करण्यासाठी या परिषदेचा फायदा होणार आहे.

परिषदेमुळे अनेक तरुण संशोधकांना नवसंशोधनाची चालना मिळेल, अशी माहिती प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी दिली. रसायनशास्त्र विभागप्रमुख व सहसंयोजक प्रा. डॉ. संजय काळे, उपक्रम सचिव प्रा. भीमराव तोरणे व प्राध्यापक वर्गाकडून आयोजनाची तयारी केली जात आहे.

### ३५० पेक्षा जास्त नोंदणी

या परिषदेत डॉ. भीष्म कारकी (नेपाळ), डॉ. विजय वड्डेर (सोलापूर), डॉ. सुदेश मांजरे (मुंबई), प्रा. जे. मंजन्ना (बेळगाव), डॉ. अनिथा प्रिया (चेन्नई), प्रा. गजानन राशिनकर (कोल्हापूर), प्रा. डॉ. शोभा वाघमोडे (पुणे) आदींसह देशभरातून ३५० हून जास्त संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी, उद्योजक सहभागी होणार आहेत.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

दै. पुढारी दि. १८/०३/२०२३ पान नं. ६ (पुणे जिल्हा)

सहभागी महिला वंदना राघवण यांनी सांगितले.

# विद्यापीठ तक्रार निवारण समितीवर डॉ. लोखंडे



बारामती : बारामती येथील टी. सी. महाविद्यालयातील प्रा. डॉ. सुनील लोखंडे यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीवर बिनविरोध निवड झाली आहे. डॉ. लोखंडे यांनी २०१४ मध्ये विधानसभा तसेच पुणे विभागातून शिक्षक मतदारसंघ विधानपरिषदेची निवडणूक लढवली आहे. ते अखिल भारतीय प्राध्यापक संघटनेमध्ये सक्रिय आहेत. स्थानिक शाखेचे अध्यक्ष व जिल्हा उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत ते उच्चांकी मतांनी निवडून आले होते. त्यांच्या निवडीसाठी प्रा. डॉ. के. एन. गिरमकर, प्रा. डॉ. मगन ताटे, प्रा. डॉ. रमेश गायकवाड आदींनी महत्त्वाची भूमिका बजावली. अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह, सचिव मिलिंद शाह, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

Scanned with OKEN Scanner

दैनिक सकाळ दि. २९/०३/२०२३ पान नं. ४



बारामती : टीसी महाविद्यालयातील गुणवंत खेळाडू.

# टीसी महाविद्यालयाच्या खेळाडूंचा गौरव

बारामती : येथील टीसी महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा नैपुण्य पारितोषिक वितरण समारंभ झाला. या वेळी विविध खेळात विशेष यश संपादन केलेल्या १७० खेळाडूंचा रोख पारितोषिक, ट्रॅकसूट आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रगुप्त वाघोलीकर होते. महाविद्यालयाकडून ६४ हजारांची रोख पारितोषिके खेळाडूंना दिली. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी भाग्यश्री बिले-कसगावडे तसेच क्रीडा उपसंचालक महादेव कसगावडे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी प्रास्ताविक केले. क्रीडा पारितोषिक अहवालाचे वाचन जिमखाना विभागाचे प्रमुख डॉ. गौतम जाधव तर पारितोषिक वितरण वाचन अशोक देवकर यांनी केले. एशियाओ शियाना कॉर्फबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाल्याबद्दल प्रणव पोमणे, दक्षिण आशियाई कराटे स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाल्याबद्दल मंथन भोकरे यांचाही सत्कार केला. सूत्रसंचालन डॉ.विवेक बळे यांनी केले, डॉ. गौतम जाधव यांनी आभार व्यक्त केले.

सकाळ दि २९/३/२०२३ पान नं.४

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★

Scanned with OKEN Scanner